पुढारी

# विवेकानंद महाविद्यालयात ओझेन दिवस साजरा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

ओझोन वायूच्या थराचे संरक्षण कशाप्रकारे करता येईल, त्याचा नाश करणाऱ्या रासायनिक घटकांची निर्मिती म्हणजे क्लोरो-फ्लोरोकार्बन (CFC वायू) तयार करणाऱ्या उपकरणांचा वापर कमीत कमी करावा. असे प्रतिपादन सायबर कॉलेजच्या पर्यावरणशास्त्र विभागाच्या प्रा. रसिया पडळकर यांनी केले.

विवेकानंद महाविद्यालयांमध्ये ओझोन डेनिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. डी. बी. पाटील होते. प्रास्ताविक धनश्री पाटील यांनी केले. सूत्रसंचालन प्राजक्ता घोलप यांनी केले. डॉ. के. ए. उंडाळे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. एस. डी. शिर्के, डॉ. एस. डी. शिंदे, पी. एम. रूईकर उपस्थित होते.